**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २६/२०१७-१८/ 23 दिनांक: 03/02/2018

**आदेश**

**आदेश केस क्र. २६/२०१७-२०१८**

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. सारिका दिलीप बनछोडे<br>गट क्र. ९९ बालेवाडी पो. माडूकली ता गगनबावडा<br>पत्ता:- प्लॉट क्र.१०० रुईकर कॅालनी कोल्हापूर<br>जि. कोल्हापूर : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग गगनबावडा | |

**कोरम:-** १.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

29.1.2018

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण



१) आज दिनांक २५.०१.२०१८ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे सौ. सारिका दिलीप बनछोडे, गट क्र. ९९ बालेवाडी पो. माडूकली, ता. गगनबावडा जि. कोल्हापूर यांची सुनावणी घेणेत आली . सदर सुनावणीस अर्जदार तक्रारदार ग्राहकातर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे आणि वि.प.तर्फे श्री राजेंद्र हजार, कार्यकारी अभियंता ग्रामिण विभाग-१कोल्हापूर हे हजर होते.

२) तक्रारदार ग्राहक यांनी परिशिष्ट क्ष मध्ये दिनांक १७.०४.२०१७ ला अर्ज केला होता तो अंतर्गत कक्षाने अमान्य करुन फेटाळला आहे. सदर ग्राहकाने अ फॅार्म मध्ये या मंचाकडे या निर्णया विरुध्द ३० जून, २०१७ रोजी या विरुध्द ग्राहणे दाखल केले आहे.

अर्जदार यांनी लघुदाब शेती पंपाच्या (L.T.Ag.) एकूण चार स्टेजसाठी कार्यकारी अभियंता ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर यांच्या चार वेगवेगळी विद्युत जोडणी मिळणे बाबत अर्ज केले होते. त्याचा मंजूरी क्रमांक खालील प्रमाणे आहेत.

१) नॉन डीडीएफ/८३७/२००९-१० पत्र क्र. १५२ दिनांक ०६.०१.२०१०
२) नॉन डीडीएफ/७०५/२००९-१० पत्र क्र. ७७४९ दिनांक ३०.११.२००९
३) नॉन डीडीएफ/७०६/२००९-१० पत्र क्र. ७७५१ दिनांक ३०.११.२००९
४) नॉन डीडीएफ/७०७/२००९-१० पत्र क्र. ७७५० दिनांक ३०.११.२००९

या प्रमाणे मंजूरी दिली होती.

हा विज पुरवठा उंच डोंगर माथ्यावर करावयाचा असलेने आणि नॉन डीडीएफ असलेने सर्व कामे पूर्ण करुन ग्राहकानेसर्व Infrastucutre उभे केले आणि इतर कायदेशीर बाबींची पूर्तता केलेनंतर कार्यकारी अभियंता ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर यांनी विद्युत निरिक्षक परवाना वगैरे बाबीची पूर्तता केलेनंतर दिनांक ०२.०७.२०११ रोजी Charging Permission दिली आहे.शेती मधील पाईप लाईन शेततळे इतर बाबी पूर्ण झाल्यानंतर दिनांक ०८.०९.२०१५ रोजी जोडणी द्यावी असा अर्ज दिला पण मिटर शिल्लक नाहीत, म्हणून त्वरित पुरवठा न करता दिनांक २०.०४.२०१६ रोजी विज पुरवठा चालू केला.

आपल्या गा-हयाण्यामध्ये ग्राहकाने पुढे असे म्हटले आहे की, सदर विद्युत पुरवठा चालू करणेपूर्वी उपकार्यकारी अभियंता , गगनबावडा यांनी आम्ही विद्युत पुरवठयासाठी उभा केलेल्या Infrasturcutre NonDDF चा खर्च परत मागणार नाही असे लिहून घेतल्यावर आम्हाला दिनांक २०.०४.२०१६ ला विज पुरवठा देण्यात आला यापूर्वी दिनांक २९.०२.२०१६ रोजी आम्ही जर नॉन डीडीएफ योजनेनुसार केलेला खर्च परत मागितला तर तो अटींचा भंग समजून कोणतीही पूर्व सूचना न देता वि.प. वीज पुरवठा खंडीत करु शकेल असे पत्र दिले.

नॉन डीडीएफ योजना ही शेती पंपासाठी कार्यकारी अभियंता Authority to Sanction मध्ये Connection या योजनेतून साकारलेली योजना आहे यातील क्र.१४ ची अट असे सांगते की, The cost of actual quantity of material used as per estimate rate 'only be refunded through energy bill . याप्रमाणे आम्ही सदर योजनेतून सर्व खर्च केलेला आहे तो नियमाप्रमाणे आम्हास व्याजासह परत मिळावा अशी मागणी मंचासमोर मांडली आहे.

यासाठी त्यानी खालील दाखले दिले आहेत.

१) मंजूरी पत्रामध्ये अट क्र.१४ नुसार सर्व खर्च बिलातून देय असे म्हटलेले आहे.
२) (वाणिज्य परिपत्रक) मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई परिपत्रक क्र. २२१९७ दिनांक २०.०५.२००८

29.1.2018

३) मुख्य अभियंता वाणिज्य पत्र क्र. २३०३५ दिनांक २२.०५.२००७ मध्ये केस क्र. ७०/२००५ चा उल्लेख केला परिपत्रक क्र.४३ दिनांक २७-०९-२००६ या संबंधीचे आहे.याच बरोबर डीडीएफ खेरीज कोणत्याही योजनेसाठी ग्राहकाकडून खर्च वसूल करुन घेता येत नाही. हेही आयोगाने आदेशाचा उल्लेख केला आहे.

१)मा. राज्य आयोगाने जी शेडयूल ऑफ चार्जेस केसक्र. ७०/२००५ आदेश दि. ०८.०९.२००६ नुसार Infrasturcutre हा सर्व खर्च महावितरणे करावयाचा आहे हे स्पष्ट होते असे म्हटले आहे.

२) वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. २२१९७ दिनांक २०.०५.२००८ यामध्ये खर्चाचा परतावा हा देयकामधून केला जाईल असा उल्लेख आहे.

३) आयोगाचे विविध आदेश इतर काही मंचाचे आदेश याही बाबीचा उल्लेख ग्राहक प्रतिनिधी यानी सुनावणी दरम्यान विस्तृतपणे केला .

वि.प.तर्फे आपली भूमिका मांडताना श्री राजेंद्र हजारे, कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे पत्र क्र. ३८४८ दिनांक १३.०७.२०१७ मध्ये असे म्हटले आहे की, उंच डोंगरावर पाणी पोच विण्यासाठी १०० अश्वशक्ती ४ स्टेज करावे लागत होते आणि ते समर्पित DDF करुन द्यावे लागणार होते. त्यामुळे तसे अंदाजपत्रक तयार मंजूर करुन दिले काम पूर्ण झाल्यानंतर ०२.०७.२०११ ला विद्युत भारीत करण्याचे परवानगी दिली. जुलै २०११ ते २०१५ या कालावधीत अर्जदाराने विज जोडणीसाठी सर्व्हीस लाईन तयार केली नाही व कनेक्शन जोडून घेतले नाही. अर्जदाराने दि. ०६.०९.२०१५ रोजी विज कनेक्शन जोडणीसाठी पुन्हा अर्ज दिल्यानंतर नव्याने परवानगी घेऊन विज जोडणी देण्यात आली या पत्रात महावितरणने १ ते १७ संदर्भ देऊन विविध स्तरावरीकल घटनाक्रम मांडला आहे. याच पत्रात शेती पंपासाठी डीडीएफ नको आहे, अशा ग्राहकांना नॉन डीडीएफ नुसार देण्यात येणारी मंजूरी CE(Dist.) Re/Ag/Pump/No.४९०२ दिनांक १२.०२.२०१४ नुसार बंद केल्याचा उल्लेख केला आहे. तसेच मा. महाराष्ट्र विज आयोग विनियम २००५ तरतूद क्र.४ उप तरतूद २.४ व महावितरण परिपत्रक CE(Dist.) Bill Circulars/२२१९७ Date २०.०५.२००८ नुसार जर एखाद्या ग्राहकाला विज पुरवठा करताना ग्राहकाधिष्ठीत वितरण सुविधा उभाराव्या लागत असतील तर विनियम १८ खाली आयोगाने मंजूरी दिलेल्या आकाराच्या अनुसूचीच्या आधारे अशा कामासाठी झालेला सर्व वाजवी खर्च अर्जदाराकडून वसूल करण्यास वि.पक्षास अधिकार आहे . या दोन तरतूदी नुसार सदर ग्राहकास परतावा मिळणार नाही असे लेखी व तोंडी प्रतिपादन केले तसेच नॉन डीडीएफ योजने अंतर्गत दिलेले पुरवठयाचा खर्च मिळत नसतो असेही सांगितले अर्जदाराने स्वतःला हवे असणारे कनेक्शन त्वरित मिळावे म्हणून हा खर्च स्वतः केला आहे. त्याने हा खर्च परत मागणार नाही असे लेखी लिहून दिले आहे. त्याची जोडणी त्यांच्या दि. ०६.०९.२०१५ च्या अर्जानुसार चालू करुन दिली आहे. सबब परिपत्रक क्र. CE/Dist./RE/Ag.Pump/४९०० दिनांक १२.०२.२०१४प्रमाणे Non DDF मंजूर करता येत नाही. म्हणून ग्राहकाची मागणी फेटाळून लावण्यात यावी असे सांगितले .

दोन्ही पक्षाचे लेखी अहवाल तोंडी निवेदन आणि चर्चा विचारात घेता पुढील प्रश्न उपस्थित होतात.

१) ग्राहकाची मागणी मान्य करता येईल का?

उत्तर:- होय.

२) आदेश

उत्तर:- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

29.1.2018

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

ग्राहकाने विज जोडणी करता मागणी केलेले अर्जाच्या मंजूरीच्या प्रति कामकाजात हजर केलेल्या आहेत. त्यामध्ये सदर मागणी एन.डी.डी.एफ ची असल्याची स्पष्ट नोंद आहे. मंजूरी पत्राच्या मागे Non DDF योजनेच्या अटी व शर्ती नमूद आहेत. यामध्ये शर्त १४ मध्ये The cost of actual quantity of material used as per the estimated rate only be refunded through energy bill असे म्हटले आहे. याचा आधार अर्जदाराने घेतला आहे.तो मंचास योग्य वाटतो. या सर्व मंजू-या २००९ व २०१० मधील आहेत. त्यावेळी Non DDF ही योजना आस्तित्वात होती. ग्राहकाने आपल्या जोडण्या २०१५ मध्ये कार्यान्वीत केल्या आहेत त्यावेळी वि.प.च्या म्हणण्यानुसार, २०१४ च्या परिपत्रक क्र. ३०३० दि. २९.०१.२०१४ आणि परिपत्रक क्र. ४९०० दिनांक १२.०२.२०१४ मधील नुसार २००८ ते NDDF संबंधी योजना रद्द झाली असून या ग्राहकाने २०१५ साली विज जोडणी कार्यान्वीत केले आहे. सबब नविन परिपत्रकानुसार ही योजना आम्ही DDF म्हणून संबोधित करत आहोत आणि म्हणून या ग्राहकास त्याने केलेला खर्च परत मागण्याचा अधिकार नाही यावर या परिपत्रकातील परिपत्रक क्र. ४९०० दिनांक १२.०२.२०१४ कॉलम क्र.२ असा आहे की, Henceforth no works related to release of Ag. connections to individual/group under NonDDF (CCF&F) scheme should be sanction व तसेच CE/Dist/D-III/CEs/२५६८० Date १९.०६.२००८ या संबंधी परिपत्रक क्र. ३०३० दिनांक २९.०१.२०१४ नुसार जो खुलासा केला आहे की "Now it is decided that henceforth कॉलम क्र.२ Already paid pending Agricultural connections cases sanctioned under category Non DDC (CCR&F) & DDF may be executed and no new application shall be entertained henceforth" असे म्हटले आहे, हया खेरीज ग्राहकाने हजर केलेले विविध निकाल, या सर्वाचा विचार करता आमचे असे स्पष्ट मत झाले की, ग्राहकाला हे NDDF साठी खर्च केलेले पैसे परत मागण्याचा कायदेशीर हक्क आहे. महावितरणने जरी आपली परिपत्रके काढताना ग्राहकास पूर्ण न्याय मिळावा असा विचार केलेला दिसतो. तरी अमंलबजावणी करताना अधिका-यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे ग्राहकास त्रास झाला आहे, आणि त्यांची एवढी मोठी रक्कम अडकून पडली आहे. या आदेशानुसार ग्राहकाने चार टप्यातील केलेला एकूण खर्च रु. ३३,५३,१६०/-(रु. तेहतीस लाख त्रेपन्न हजार एकशे साठ मात्र )असून सदर रक्कमेचा परतावा बिलातून व्हावयास हवा होता पण तो न होता महावितरणची परिपत्रके नियम हे सर्व डावलून आम्ही रिफंड मागणार नाही असे लिहून घेऊन ग्राहकास अधिकारापासून वंचित ठेवले आणि त्यांचे आर्थिक नुकसान केले हे स्पष्ट होते. महावितरण कंपनीच्या परिपत्रका विरुध्द , जर अशा प्रकारची हमी पत्रे ग्राहकांकडून लिहून घेत जात असतील तर अशा हमीपत्रांना कोणताही कायदेशीर आधार राहत नाही, व ती हमीपत्रे परिपत्रकातील तरतुदी विरुध्द वापरली जाऊ शकत नाही. अशी हमीपत्रे , ही मुलतःच बेकायदेशीर ठरतात. त्यामुळे त्यावर अवलंबून राहून विद्युत वितरण कंपनीला सदर हमीपत्रामुळे, ग्राहकाला रिफंड मागता येत नाही, असे म्हणता येत नाही. विद्युत वितरण कंपनीचे सदर प्रतिपादन बेकायदेशीर आहे, सबब त्याचा विचार हया कामी करता येत नाही.

29.1.2018

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

हे जरुर आहे की, NonDDF योजने अंतर्गत , तसेच विद्युत कनेक्शन मंजूरीच्या पत्रात नमुद असणा-या अट क्र.१४ मध्ये "cost of actual quantity of material used as per the estimated rate only, be refunded through energy bill" असे म्हटले आहे. हया नुसार तक्रारदाराने विद्युत संच उभारणी करता केलेला खर्च हा त्याच्या विद्युत बिलांतून वजा करावा लागेल. परंतु ग्राहकाने संच उभारणी करता केलेला खर्च हा रु. ३३,५३,१६०/- इतका असल्याचे दिसते, व त्या बाबत दुमत नाही. तक्रारदारास देण्यात आलेल्या विज बिलाचा जर विचार केला तर हे प्रथम दर्शनी दिसून येते की, त्यास त्रैमासिक , सर्व साधारणतः रु. १२,०००/- पर्यन्त विज बिल येते. हयाचा विचार करता व ग्राहकाने केलेल्या संच उभारणीचा खर्च रु, ३३,५३,१६०/- हयाचा विचार करता व त्यावर देय व्याजाचा देखील विचार करता, हे स्वयंस्पष्ट आहे की, ग्राहकाच्या विज बिलातून सदरच्या रक्कमा वजा करण्यात बराच कालावधी लागु शकतो. दरम्यानच्या कालावधीत ग्राहकास देय असणा-या रक्कमेवर व्याज आणि त्या व्याजावर व्याज चढत राहिल व कंपनीची देयता वर्षानुवर्षे चालूच राहिल. ही बाब मा. विद्युत आयोगाच्या **मौला शेखु नदाफ - वि. - म.रा.वि.वि.कं.मर्या. (केस क्र. ३६/२००९)** च्या दिनांक १९-१२-२००९ च्या निकालातील "On the other hand payment of Interest on par payment over a long duration would be against good commercial principles and Prudent utility practices" हया निरीक्षणामुळे , मान्य करता येत नाही. त्या प्रकरणांत मा. आयोगाने ग्राहकांस देय होणा-या रक्कम व व्याजाचा विचार करुन , सर्व देय रक्कम एक रकमी रोख देण्याचा आदेश पारीत केलेला आहे. मा. आयोगाचा सदर निकाल हया मंचावर बंधनकारक आहे. त्यामुळे हया प्रकरणांतील सर्व बाबींचा साकल्याने विचार करता ग्राहकास देय रक्कम एकरकमी , व्याजासहीत, घ्यावी असा आदेश करणे योग्य राहिल. असा हया मंचाचा निष्कर्ष आहे.

सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) जाबदार विद्युत वितरण कंपनीने तक्रारदारांस रक्कम रु. ३३,५३,१६०/- फक्त , धनादेशाने, एक रकमी हया आदेशाचे तारखे पासून १ महिन्याचे आत घ्यावी.

३) सदर रक्कमेवर ,जाबदार वीज वितरण कंपनीने, प्रथम विज बिल देयकाचे तारखेपासून म्हणजे मे-२०१६ पासून रक्कम परत करण्याचे तारखे पर्यन्त प्रचलित बॅंक दराने म्हणजे द.सा.द.शे. ७% दराने व्याज घ्यावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

29.1.2018.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. बुरांडे) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण